# शिवाजी विद्यापीठात 'निवृत्त शिक्षकाच्या शिष्यवृत्ती'चे वितरण

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थ्यांनीसुद्धा चांगल्या शिक्षकांचा आदर्श घेऊन आयुष्यात सर्वोत्तमतेचा ध्यास घेऊन कारकीर्द घडवावी, असे आवाहन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या सन २०१८-१९ साठीच्या 'निवृत्त शिक्षकाच्या शिष्यवृत्ती'चे गुरुवारी शिक्षक दिनाचे औचित्य साधून वितरण करण्यात आले. त्यानिमित्ताने व्यवस्थापन परिषद सभागृहात झालेल्या छोटेखानी कार्यक्रमात ते बोलत होते.

विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान विभागातील एम.एस्सी. भाग-२ मधील विद्यार्थी अजिंक्य राम भोसले आणि दामिनी प्रकाश माळी या दोघांना या शिष्यवृत्तीचे वितरण करण्यात आले.

पदार्थविज्ञान विभागातील निवृत्त शिक्षक व संशोधक डॉ. बी. व्ही. खासबारदार यांनी एप्रिल १९९९ मध्ये सेवानिवृत्तीनंतर मिळालेल्या रकमेतून रु. ५५ हजार रुपयांचा निधी विद्यापीठाकडे सुपूर्द केला. त्याच्या व्याजातून सदर शिष्यवृत्ती दरवर्षी डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवनमध्ये राहून पदार्थविज्ञान विभागात प्रथम वर्ष उत्तीर्ण होऊन दुसऱ्या वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार दिली जाते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, डॉ. खासबारदार हे स्वतः स्पेक्ट्रोस्कोपी विषयाचे गाढे अभ्यासक व उत्कृष्ट संशोधक व मार्गदर्शक होते. पदार्थविज्ञान विभागात मार्च १९६५ पासून ते कार्यरत होते. ३५ वर्षांत त्यांनी अत्यंत मोलाची अध्यापकीय व संशोधकीय कामगिरी केली. विद्यार्थ्यांनी हा वारसा पुढे न्यावा, यासाठी प्रेरणा म्हणून त्यांनी ही शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय घेतला.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रसूल कोरबू, डॉ. आप्पासाहेब पवार, रेक्टर डॉ. संभाजी शिंदे, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, जी. एस. राठोड यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

परदेशी भाषा शिकण्याकडे आपल्याकडील युवकांचा मोठा ओढा आहे. या परदेशी भाषांमध्ये भर पडली आहे ती पोर्तुगीज भाषेची. शिवाजी विद्यापीठात विदेशी भाषा विभागात पोर्तूगीज भाषा शिकण्याची संधी उपलब्ध झाली आहे. हा विभाग तुम्हाला नेहमीच बेम विंदो म्हणतोय. म्हणजे तुमचे सहर्ष स्वागत..

# बेम विंदो ...पोर्तुगीज

स्वप्नील जाबशेट्टी
सीसीआर, भारती विद्यापीठ

पोर्तुगीज ही युरोपियन भाषा आहे. अनेक वर्षे गोव्यावर पोर्तुगीजांची राज्य केल्यामुळे तेथे जुनी पोर्तुगीज भाषा अजूनही काही ठिकाणी बोलली जाते. गोवा येथे आठवी, नववी आणि दहावीच्या अभ्यासक्रमात पोर्तुगीज भाषेचा समावेश आहे. संपूर्ण भारतात दिल्ली व गोवा येथे ही भाषा अस्तित्वात आहे. संपूर्ण महाराष्ट्रात पोर्तूगीज भाषा विभाग सुरू करण्याची किमया शिवाजी विद्यापीठाने केली आहे. डॉ. मेघा पानसरे यांनी यासाठी परिश्रम घेतले.

कमोईश संस्था ही पोर्तुगाल दूतावास, सांस्कृतिक केंद्र गोवा संचलित संस्था आहे. तसेच कमोईश शैक्षणिक संस्था आणि शिवाजी विद्यापीठ यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे. पोर्तुगीज भाषेत अनेक इतिहासाचे दाखले उपलब्ध आहेत. या भाषेमुळे इतिहासाचा अभ्यास सहज शक्य होणार आहे. पोर्तुगीज ही भाषा ब्राझिल, मोसांबीक तसेच आणखी सहा ते सात देशांमध्ये बोलली जाते. दोन देशांमधील विद्यार्थ्यांचा इंटरनॅशनल एक्सचेंज प्रोग्राम म्हणून भारतातील विद्यार्थी पोर्तुगालमध्ये काही महिने राहू शकतात, तसेच तेथील विद्यार्थी इकडे येऊ शकतात.

पोर्तुगीज भाषा कोर्स हा तीन वर्षांचा आहे. ऐश्वर्या चव्हाण या पोर्तुगीज भाषा शिकवतात. त्यांनी पोर्तुगीज भाषेत एम. ए. चं शिक्षण पूर्ण केले आहे. पोर्तुगीज भाषा शिकण्यासाठी डॉ. डेल्फिम कोरेईया द सिल्वा यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले. ही भाषा शिकून विद्यार्थ्यांना इंटरनॅशनल कंपन्यांमध्ये लँग्वेज ट्रान्सलेटर म्हणून नोकरी करता येऊ शकते. तसेच स्वतंत्र बिझनेसदेखील करता येतो. हा कोर्स शिकून भविष्यामध्ये शैक्षणिक सहली सुद्धा नियोजित केल्या जाऊ शकतात. त्यामुळे जर तुम्हाला ही भाषा शिकायची असेल तर पोर्तुगीज विभाग नेहमीच म्हणतो बेम विंदो! म्हणजेच वेलकम.



पोर्तुगीज भाषा २१ व्या शतकामध्ये दोन देशांमधील संबंधात एक सांस्कृतिक दुवा म्हणून काम करते आहे. या भाषेमुळे इतिहास, राजकारण, व्यापारी संबंध, कला, संगीत व क्रीडा अशा सर्वच क्षेत्रांत भाषा अभ्यासकांना नवी दिशा मिळेल.

– डॉ. मेघा पानसरे,
विदेशी भाषा विभागप्रमुख



पोर्तुगीज भाषा शिकल्यामुळे इंटरनॅशनल कंपनीसोबत तुम्ही काम करू शकता. तसेच ओवरसीज बिझनेस देखील करू शकता. दोन देश जेव्हा एकत्र येतात तेव्हा लँग्वेज ट्रान्सलेटर लागतो, भाषा रुपांतरण करण्यासाठी जे आजकाल दुर्मीळ आहेत.

– ऐश्वर्या चव्हाण,
पोर्तुगीज भाषा शिक्षिका

17 SEP 2019
तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जिल्हास्तरीय युवामहोत्सव बुधवारी

## कोल्हापूरचे यजमानपद जयसिंगपूरच्या डॉ. जे. जे. मगदूम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगकडे

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठअंतर्गत ३९ वा कोल्हापूर जिल्हास्तरीय युवामहोत्सव बुधवार १८ सप्टेंबर रोजी सकाळी ९.३० वाजता यजमान जयसिंगपूर येथील डॉ. जे. जे. मगदूम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये होणार आहे. महोत्सवाचे उद्‌घाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमन मित्तल यांच्या हस्ते होणार आहे. व्यवस्थापन परिषद सदस्य अमित कुलकर्णी प्रमुख पाहुणे तर आमदार डॉ. सुजित मिणचेकर अध्यक्षस्थानी आहेत. मध्यवर्ती युवामहोत्सव फलटण येथील मुधोजी महाविद्यालयात २६ ते २८ सप्टेंबरदरम्यान होणार आहे, अशी माहिती विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी दिली. युवा महोत्सवासंदर्भातील माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली आहे. लोकसंगीत वाद्यवृंद, लोककला, लोकनृत्य, लघुनाटिका, मुकनाट्य, नकला, सुगमसंगीत, अशा ३२ प्रकारांचा समावेश आहे.

### जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे वेळापत्रक

| जिल्हा | यजमान | तारीख |
|---|---|---|
| कोल्हापूर | डॉ. जे. जे. मगदूम कॉलेज(जयसिंगपूर) | १८ सप्टेंबर |
| सांगली | वारणा महाविद्यालय, ऐतवडे खुर्द | २० सप्टेंबर |
| सातारा | प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय, देऊर | २२ सप्टेंबर |
| मध्यवर्ती | मुधोजी महाविद्यालय, फलटण | २६, २७, २८ सप्टेंबर |

लोकमत

# पथनाट्याद्वारे पर्यावरण संवर्धनाचा संदेश

## जागतिक ओझोन दिन : शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र अधिविभागाचा उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्याद्वारे पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोर सोमवारी या विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले.

‘जागतिक ओझोन दिना’निमित्त पर्यावरणशास्त्र अधिविभागातर्फे विशेष पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी कोल्हापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांची प्रमुख उपस्थिती



शिवाजी विद्यापीठात सोमवारी ‘जागतिक ओझोन दिना’निमित्त पर्यावरणशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी विशेष पथनाट्य सादर केले.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर ‘वन-वणवा’ हे

रोपांची लागवड करुन पर्यावरण संवर्धनाचा संदेश या पथनाट्यातून

आयुक्त कलशेट्टी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या पथनाट्याचे लेखन डॉ. योजना पाटील यांनी केले, त अस्मिता पाटील, अभिजित मोरे यांनी गीतलेखन केले.

या पथनाट्यात राहुल घट्टे, अनुजा जाधव, बैशाली देसाई, रुपाली उपळकर, मयुरी गोसावी, ज्योती कांबळे, महेश चव्हाण, अक्षय पाटील आणि प्रेरणा घेवारी यांनी पथनाट्यात काम केले. यावेळी वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, पर्यावरण अधिविभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत, अधिष्ठाता डॉ. भारती पाटील, ए. एम. गुरव, आयक्यूएसीचे संचालक डॉ. आर. के. कामत

# विद्यापीठात जागतिक ओझोनदिनी पथनाट्य

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

जागतिक ओझोन दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागातर्फे विशेष पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले. महापालिकेचे आयुक्त मल्लिनाथ कलशेट्टी, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची प्रमुख उपस्थिती होती.

जागतिक तापमानवाढीच्या अनुषंगाने जनजागृती करण्यासाठी दरवर्षी जागतिक ओझोन दिन साजरा करण्यात येतो. शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागाद्वारेही विविध उपक्रम, स्पर्धा आदींच्या माध्यमातून याविषयी जागृती करण्यात येते. सोमवारी ओझोन दिनाचे औचित्य साधून या अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर 'वन-वणवा' हे पथनाट्य सादर केले. वृक्षतोड रोखून रोपांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश या पथनाट्यातून देण्यात आला. सादरीकरणानंतर आयुक्त कलशेट्टी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना अधिक प्रभावी सादरीकरणासाठी सूचना केल्या.



**कोल्हापूर : जागतिक ओझोन दिनानिमित्त विशेष पथनाट्याचे सादरीकरण करताना शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाचे विद्यार्थी.**

या पथनाट्याचे लेखन डॉ. योजना पाटील यांनी केले. अस्मिता पाटील, अभिजित मोरे यांनी गीतलेखन केले. या पथनाट्यात राहुल घट्टे, अनुजा जाधव, वैशाली देसाई, रूपाली उपळकर, मयुरी गोसावी, ज्योती कांबळे, महेश चव्हाण, अक्षय पाटील आणि प्रेरणा घेवारी यांनी पथनाट्यात काम केले.

वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, पर्यावरण अधिविभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत, अधिष्ठाता डॉ. भारती पाटील, डॉ. ए. एम. गुरव, आयक्यूएसीचे संचालक डॉ. आर. के. कामत, डॉ. आसावरी जाधव यांच्यासह अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

17 SEP 2019

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'वन-वणवा' पथनाट्यातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश



कोल्हापूर : पथनाट्याचे सादरीकरण करताना पर्यावरणशास्त्र विभागाचे विद्यार्थी.

प्रतिनिधी
कोल्हापूर

जागतिक तापमानवाढीच्या अनुषंगाने जनजागृती करण्यासाठी जागतिक ओझोन दिन विद्यापीठात साजरा करण्यात आला. मुख्य इमारतीसमोर पर्यावरणशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी 'वन-वणवा' हे पथनाट्य सादर केले. यातून वृक्षतोड रोखून रोपांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. सादरीकरणानंतर महापालिका आयुक्त मल्लिनाथ कलशेट्टी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

जागतिक ओझोन दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागातर्फे विशेष पथनाट्याचे सादरीकरण केले. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची प्रमुख उपस्थिती होती. 'वन-वणवा" पथनाट्याचे लेखन डॉ. योजना पाटील यांनी केले, तर अस्मिता पाटील, अभिजीत मोरे यांनी गीतलेखन केले. राहुल घट्टे, अनुजा जाधव, वैशाली देसाई, रूपाली उपळकर, मयुरी गोसावी, ज्योती कांबळे, महेश चव्हाण, अक्षय पाटील आणि प्रेरणा घेवारी यांनी पथनाट्य सादरीकरण केले. यावेळी व्ही. टी. पाटील, पर्यावरण अधिविभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत, डॉ. भारती पाटील, डॉ. ए. एम. गुरव, आयक्यूएसीचे संचालक डॉ. आर. के. कामत, डॉ. आसावरी जाधव यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.

सकाळ


# ओझोन दिनानिमित्त विद्यापीठात पथनाट्य

## विविध उपक्रमांचे आयोजन; पर्यावरण संवर्धनाचा दिला संदेश

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १६ : जागतिक ओझोन दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागातर्फे 'वन वणवा' या विशेष पथनाट्याचे सादरीकरण झाले. वृक्षतोड रोखून रोपांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश या पथनाट्यातून देण्यात आला. यावेळी आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के उपस्थित होते.

जागतिक तापमानवाढीच्या अनुषंगाने जनजागृती करण्यासाठी दरवर्षी जागतिक ओझोन दिन साजरा करण्यात येतो. शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र



अधिविभागाद्वारेही विविध उपक्रम, स्पर्धा आदींच्या माध्यमातून याविषयी जागृती करण्यात येते. या पथनाट्याचे लेखन डॉ. योजना पाटील यांनी केले, तर अस्मिता पाटील, अभिजित मोरे यांनी गीतलेखन केले. या पथनाट्यात राहुल घट्टे, अनुजा जाधव, वैशाली देसाई, रूपाली उपळकर, मयूरी गोसावी, ज्योती कांबळे, महेश चव्हाण, अक्षय पाटील आणि प्रेरणा घेवारी यांनी सहभाग घेतला.

यावेळी वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, पर्यावरण अधिविभाग प्रमुख डॉ. पी. डी. राऊत, अधिष्ठाता डॉ. भारती पाटील, डॉ. ए. एम. गुरव, 'आयक्यूएसी'चे संचालक डॉ. आर. के. कामत, डॉ. आसावरी जाधव आदी उपस्थित होते.

### वेतनवाढीसाठी 'सुटा' याचिका दाखल करणार

**कोल्हापूर** : निवृत्तांच्या वेतनवाढीसाठी शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ-'सुटा'च्या वतीने उच्च न्यायालयात याचिका दाखल करणार असल्याचे पत्रक 'सुटा'चे प्रमुख कार्यवाह डॉ. डी. एन. पाटील यांनी दिले आहे. २००६ पासून आजअखेरच्या कालावधीमध्ये जे प्राध्यापक ३० जून या तारखेला नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. अशा सर्व प्राध्यापकांना लगतच्या एक जुलै या तारखेला देय असणारी वेतनवाढ मिळणे आवश्यक होते. मात्र, शिवाजी विद्यापीठाच्या कक्षेतील प्राध्यापकांना ही वेतनवाढ मिळालेली नाही. त्यामुळे या प्राध्यापकांना वेतनवाढ मिळण्यासाठी ही याचिका दाखल केली जाणार आहे. या याचिकेत सहभागी होण्यासाठी अशा सर्व प्राध्यापकांनी 'सुटा'शी संपर्क साधावा, असे आवाहनही या पत्रकातून केले आहे.

लोकमत

# रशियन अभ्यासक्रमाद्वारे शिवाजी विद्यापीठाशी बंध दृढ

## द्मीत्री सकलोव : विदेशी भाषा विभागातर्फे मुक्त संवाद कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभाग हा भारत व रशिया यांच्यातील सांस्कृतिक बंध आहे. रशियन भाषा अभ्यासक्रमाच्या माध्यमातून हा बंध अधिक दृढ होत असल्याचे प्रतिपादन रशियातील मॉस्को स्टेट युनिव्हर्सिटीचे प्रा. डॉ. द्मीत्री सकलोव यांनी येथे केले.

विदेशी भाषा विभागातील रशियन भाषेच्या विद्यार्थ्यांशी 'मुक्त संवाद' या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी डॉ. मार्गारिता रेमीजवा उपस्थित होत्या.

या कार्यक्रमात रशियातील दैनंदिन जीवन, पाककला, कुटुंब व



- प्रा. डॉ. द्मीत्री सकलोव यांची रशियातील सांस्कृतिक जीवनासंबंधी चर्चा
- रशियन लोकांना भारतील निसर्ग अतिशय प्रिय

विवाहपद्धती यासंदर्भातील अनेक विषयांवर विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना डॉ. द्मीत्री सकलोव यांनी दिलखुलास उत्तरे दिली. खास रशियातून सोबत आणलेले 'मत्र्योश्का' ही लाकडी बाहुली, काळा पाव आणि कॅव्हिअर या पदार्थांची ओळख त्यांनी विद्यार्थ्यांना करून दिली. त्याचबरोबर सोविएत व उत्तर-सोव्हिएत काळातील जीवनशैलीमधील फरक स्पष्ट केला. रशियन लोकांना भारतातील निसर्ग अतिशय प्रिय असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. मार्गारिता रेमीजवा म्हणाल्या, रशियन स्त्रीने जीवनाच्या सर्व क्षेत्रात आज स्वत:चे स्थान निर्माण केले आहे. ही स्त्री हे एक अतिशय कणखर व स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असल्याचे सांगितले.

विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी सहयोगी शिक्षिका शीतल कुलकर्णी, प्रियांका माळकर उपस्थित होत्या.

# शिवाजी विद्यापीठाचा उद्या युवा महोत्सव

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठातर्फे ३९ व्या जिल्हा युवा महोत्सवाचे बुधवार, दि. १८ रोजी आयोजन करण्यात आले आहे. जयसिंगपूर येथील डॉ. जे. जे. मगदूम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगला या महोत्सवाचे यजमानपद मिळाले आहे. विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाकडून या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

महोत्सवाचे उद्घाटन बुधवारी सकाळी ९.३० वा. जि. प.चे सीईओ अमन मित्तल यांच्या हस्ते होणार आहे. आ. डॉ. सुजित मिणचेकर अध्यक्षस्थानी असणार आहेत. विद्यापीठाच्या सिनेटचे सदस्य अमित कुलकर्णी, डॉ. जे. जे. मगदूम ट्रस्टचे चेअरमन विजय मगदूम, जयसिंगपूरच्या नगरसेविका ॲड. सोनाली मगदूम यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

सकाळी ८ ते ९.३० या वेळेत संघ नोंदणी होईल. मुख्य सभामंडपात उद्घाटनानंतर १ वाजेपर्यंत लोकसंगीत, लोकवाद्य, दुपारी १ ते ४ वा. लोककला, दुपारी ४ ते ८ वा. लोकनृत्य होणार आहे. ड्रॉईंग हॉलमध्ये ११ ते १ या वेळेत लघुनाटिका, दुपारी १ ते ३ वा. मूकनाट्य, ३ ते ५ या वेळेत नकला, क्लासरूम क्रमांक ३०६ मध्ये ११ ते १ या वेळेत हिंदी वक्तृत्व, सिव्हिल सेमिनार हॉलमध्ये ११ ते २ या वेळेत सुगम गायन, २ ते ५ या वेळेत भारतीय समूहगीत याची स्पर्धा होणार आहे.